नि. फौ. केस क्रमांक २४/२०१७ निशाणी ६.

नांव – बालेचांद गुलाब शेख,
वय ५५ वर्ष, व्यवसाय- शेती,
राहणार- म्हैशाळ एम, तालुका कवठेमहांकाळ, जि.सांगली.

शपथेवर फिर्यादीचे सत्यापन...

आरोपी हे माझे नातेवाईक आहेत. जहांगीर, बेगमबी, दिलेरखान, महंम्मुलाल हे राहण्यास म्हैशाळ एम येथे व रुजवानबी ही हुक्केरी जिल्हा बेळगांव येथे राहण्यास आहे. गट नंबर ६९ हा माझे वडील गुलाब यांना कुळ कायद्याने खरेदी केलेली मिळकत आहे. सदरची जमीन ही दत्तात्रय रामकृष्ण कुलकर्णी यांच्याकडुन खरेदी घेतली होती. त्या अनुषंगाने माझ्या वडिलांना ७२-एम प्रमाणे प्रमाणपत्र मिळालेले आहे. माझे वडील सन १९९३ साली मयत झाले. गुलाब यांना मी, सिकंदर, जहांगीर, झरिनाबी, जमिलाबी व आमची आई जयनबी असे वारस आहोत. माझा सख्खा भाउ जहांगीर याने तहसिलदार यांच्याकडे सदर मिळकतीबाबत वारसा अर्ज दाखल केला. सदर अर्जात मिळकतीवर आमच्यासहित चुलत्यांचे व त्यांच्या मुलांची नावे लावण्यासाठीचा मजकुर नमुद आहे व त्या अनुषंगाने त्यांनी बोगस नावे लावुन घेतली. त्यानंतर रुझवानाबी यांच्याकडुन जहांगीर यांने त्याची पत्नी बेगमबी हिच्या नावे ९० गुंठे जमीन व तीन खण घराची जागा खरेदी घेतलेली आहे. सदर बाब आम्हास कळुनही दिलेले नाही. तसेच त्यांचा सदर मिळकतीशी कोणताही संबंध नाही. सदर खरेदीखताबाबत मी तक्रार केली आहे. त्यामुळे त्यांची नावे लागल्याचा फेरफार रद्द झालेला आहे. त्याचप्रमाणे खरेदी बेकायदेशिर आहे, याबाबतचा उल्लेख सातबारामध्ये नमुद केलेला आहे. बोगस नावे लागल्याबाबतची तक्रार मी तहसिलदार यांच्याकडे केलेली होती. परंतु त्यांनी माझी दाद घेतली नाही. त्याचप्रमाणे संबंधीत पोलीस ठाण्याकडे ही मी तक्रार दिलेली होती. परंतु पोलीसांनी माझ्या तक्रारीची दखल घेतली नाही. तरी आरोपींनी बोगस खरेदीपत्र करुन बेकायदेशिरपणे मिळकतीला स्वतःची व

इतर व्यक्तींचे हक्क हितसंबंध नसतांना नावे लावलेली आहेत. तरी आरोपींना कडक शासन व्हावे. म्हणुन प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे.

................................

फिर्यादीची सही समक्ष

Digitally signed by Shrinivas Arun Kulkarni
Date: 2020.03.13 16:59:15 +05'30'

कवठेमहांकाळ (एस.ए.कुलकर्णी)

प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी,

दिनांक १३.०३.२०२० कवठेमहांकाळ